## नियमीत दिवाणी दावा क्र. ६४/२००३ मधील निशाणी १९५ खालील आदेश.

१.        प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दावा दुरुस्ती अर्जामध्ये केलेली आकारणी चुकीची असल्यामुळे त्या संदर्भातील दुरुस्ती दाव्यामध्ये करण्याची परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२.        वादीचा अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

३.        प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने यापुर्वी निशाणी १६८ वर दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज दिनांक २०/०४/२०२२ रोजी मंजुर झालेला आहे. वादीने दुरुस्ती अर्जावर दावा विषयची किंमत व दाव्याची आकारणी चुकीची केलेली आहे. त्यामुळे तांत्रीक दोष राहु नये म्हणून सदर दुरुस्तीस परवानगी देणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. तसेच दाव्याच्या स्वरुपातही कोणतेही बदल होत नाहीत. प्रस्तावीत दुरुस्ती ही केवळ तांत्रीक स्वरुपाची आहे. प्रकरणाचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रस्तावीत दुरुस्ती ही आवश्यक आहे. वादी यांनी जो निष्काळजीपणा केला आहे. त्यावर वादी यांच्यावर खर्च बसविणे योग्य व संयुक्तीक ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१.   अर्ज रक्कम रुपये ५००/-  च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२.   अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती वादीने खर्चाची पुर्तता केल्यानंतर करावी व खर्चाची रक्कम सरकार जमा करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2022.09.22 17:51:54 +0530

कोरेगाव.

दि. २२/०९/२०२२                                    सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.